प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (PM-KISAN) राज्यात राबविण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन पुरकपत्र क्रमांकः किसनि -२०१९/प्र.क्र.२०/११-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२
तारीखः ५ जुलै, २०१९.

**वाचा :**

१) शासन परिपत्रक क्रमांकः किसयो२०१९/प्र.क्र.२०/११-अे, दि.४.२.२०१९
२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांकः किसनि-२०१९/प्र.क्र.२०/११-अे, दि.१५.२.२०१९
३) शासन शुध्दीपत्रक कृषि व पदुम विभाग क्रमांकः किसनि-२०१९/प्र.क्र.२०/११-अे, दि.२७.२.२०१९
४) केंद्र शासनाच्या सचिव, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार यांचे पत्र क्र. १-४/२०१९ ,एफडब्ल्युएस II, दि.७.६.२०१९

**प्रस्तावना :**

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजना सुरू केली आहे. सदर योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्यास संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी कुटुंबांचे सर्व ठिकाणचे मिळून लागवडीलायक एकूण धारण क्षेत्र २ हेक्टर पर्यंत असेल ही अट शिथिल करुन योजना सरसकट सर्व शेतकरी कुटुंबांना लागू केली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी कुटुंबांचे सर्व ठिकाणचे मिळून लागवडीलायक धारण क्षेत्र २ हेक्टर पर्यंत असावे ही अट शिथिल करण्यात येत असून सदर योजनेअंतर्गत सरसकट सर्व शेतकरी कुटुंबे [सदर योजनेचा लाभ मिळण्यास पात्र नसलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त (दि.१५ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.५)] लाभ मिळण्यास पात्र राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०५१४४८२०५९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Neeta Eknath Shinde

Digitally signed by Neeta Eknath Shinde
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f2bffd6992498e56663024368c72b33364cfb066d53682c53a425e54d187a7c1, serialNumber=f325d659f47933958aa2d98f394db95f94be57548776492ba36e77ea1c4aa53b, cn=Neeta Eknath Shinde
Date: 2019.07.05 14:53:51 +05'30'

**( निता शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
४. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
५. सर्व मा.विधानसभा सदस्य
६. सर्व मा.विधापरिषद सदस्य
७. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई ३२
८. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुमविभाग, मंत्रालय, मुंबई ३२
९. अपर मुख्य सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१०. अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. अप्पर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती) प्रसिध्दीच्या विनंतीसह
१६. सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
१७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२१. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२२. सर्व जिल्हा परिषदांचे जिल्हा कृषि विकास अधिकारी
२३. निवड नस्ती, (११-अे).